महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गाव तलाव व पारंपारिक पाणीसाठयातील गाळ काढणेबाबत

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२

शासन परिपत्रक क्रमांक.मग्रारोहयो २०११/प्र.क्र.१८/रोहयो-१
दिनांक : १४ सप्टेंबर, २०१२

वाचा : १) शासन निर्णय क्र.मग्रारोहयो २००८/प्र.क्र.३५/रोहयो-६, दिनांक २७.०८.२००८
२) शासन निर्णय क्र.मग्रारोहयो २०११/प्र.क्र.१८/रोहयो-१, दिनांक २२.०३.२०११

परिपत्रक :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनांतर्गत गाव तलाव, पाझर तलाव, पारंपारिक साठयातील गाळ काढण्याबाबतच्या कामांना मान्यता देण्यात आली असून, याबाबतच्या सूचना दिनांक २२.०३.२०११ च्या शासन निर्णयाव्दारे निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयात पाणी साठयाच्या अनुज्ञेय प्रकारामध्ये फक्त लघु पाटबंधारे स्थानिक स्तर अंतर्गत ० ते १०० हेक्टर, जिल्हापरिषद १०१ ते २५० हेक्टर, स्थानिक स्तर ही योजना अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. सन २०१२-१३ मध्ये राज्यात निर्माण झालेली तीव्र टंचाईची परिस्थिती तसेच कमी पाऊस या पार्श्वभूमीवर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजूरांकडून कामाच्या मागणीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. ही बाब विचारात घेऊन दिनांक २२ मार्च, २०११ च्या शासन निर्णयात अंशत: बदल करुन या परिपत्रकाव्दारे सुधारित सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

२. या परिपत्रकाव्दारे गाळ काढण्याच्या अनुज्ञेय प्रकारामध्ये कोरडे पडलेले २५० हेक्टर पेक्षा मोठे तलाव / धरणांमधून गाळ काढण्याच्या प्रकाराचा समावेश करण्यात येत आहे. मात्र २५० हेक्टर पेक्षा मोठया तलाव/धरणामधील गाळ काढताना खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे:

१. २५० हेक्टर पेक्षा मोठे तलाव / धरणातील गाळ काढताना संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांपेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका-यांकडून मान्यता घेणे आवश्यक आहे.

२. गावांच्या उपयुक्ततेच्या दृष्टीने निश्चित केलेला प्राथम्य क्रम विचारात घेऊन ग्रामपंचायतीची मान्यता, ठराव व शिफारस आवश्यक आहे.

३. गाळ काढण्याच्या कामाला मंजूरी देताना गावाची लोकसंख्या, गावातील मजूरांनी कामाची केलेली मागणी व गावात उपलब्ध कामे या बाबी तसेच ग्रामपंचायतीमध्ये योजनेअंतर्गत इतर कोणतेही काम उपलब्ध् नाही अथवा सुरु नाही याची खात्री करावी.

४. कामाची निवड करताना गाळ काढण्यात येणा-या क्षेत्रात मागील तीन वर्षामध्ये गाळ काढण्यात आला नाही याची खात्री करावी .

५. सदर कामाचे एक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करावे आणि पुढील आर्थिक वर्षामध्ये त्याचा वापर करु

यावे व काढलेल्या गाळाची नोंद फिल्ड बुकमध्ये करण्यात यावी. त्यानुषंगाने फिल्ड बुकमध्ये सुरुवातीला आणि शेवटची गाळ काढण्याची नोंद करण्यात यावी.

६. गाळ काढण्याच्या कामामध्ये मजूर विस्थापीत यंत्र सामग्रीचा (labour displacing machine) वापर करण्यास मज्जाव आहे. कोणत्याही स्वरुपात ठेकेदारास वाव देण्यात येऊ नये.

७. गाळ काढयाचे काम सुरु करण्यापूर्वी, काम सुरु असताना व काम पूर्ण झाल्यानंतरच्या या प्रमाणे कामाच्या विविध पातळीवरील छायाचित्र काढण्यात यावे व योजनेच्या संकेतस्थळावर (MIS मध्ये) टाकण्यात यावे.

८. पारदर्शकतेच्या अनुषंगाने सर्वतोपरी दक्षता घेण्यात यावी.

९. गाळ काढण्याचे काम विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन या वर्षभरातच म्हणजेच दिनांक ३१.०३.२०१३ पर्यंतच अनुज्ञेय करण्यात येत आहे.

३. उपरोक्त बाबींचे काटेकोरपणे पालन करणे तसेच या संदर्भात केंद्र / राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन आदेश / परिपत्रक / मार्गदर्शक तत्वे यांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक. हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(आर.विमला)
उप सचिव (रोहयो)

प्रत :

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव
४. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
५. अतिरिक्त मुख्य सचिव
६. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई - ४००३२
७. सर्व विभागीय आयुक्त.
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०. आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य , पुणे
११. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
१२. कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई – ४००३२ (महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)
१३. सर्व उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारीण् नियोजन विभाग (रोहयो)
१४. सारसंग्रह रोहयो – १ / निवडनस्ती (रोहयो.१)